


दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २२८ ●सोमवार,दि.१७ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




# अजितदादांना रामराम, फडणवीसांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश, डॉ. क्षीरसागररांचा राष्ट्रवादीला दणका

## योगेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आणि मंत्री पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचे बीडचे नेते योगेश क्षीरसागर यांनी मनगटावरील 'घड्याळ' काढून भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांनी कमळ हाती घेतले. नगरपालिका निवडणुकीत भाजपच्या उमेदवारीवर आमचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार उभा करून बीड नगर परिषदेत सत्ता मिळवू, असा निर्धार त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर व्यक्त केला.

स्थानिक पातळीवर पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत जाणीवपूर्वक डावलले जात असल्याचे कारण सांगून योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रवादीच्या सदस्यत्वाचा तडकाफडकी राजीनामा दिला होता. दुसऱ्याच दिवशी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या छत्रपती संभाजीनगर दौऱ्यात भाजपमध्ये प्रवेश केला. नगरपालिका निवडणुकीच्या




**● भाजपचा झेंडा अधिक उंच फडकावा यासाठी प्रयत्न करणार– योगेश क्षीरसागर**

**आगामी काळात बीड तालुक्यात भारतीय जनता पक्षाची विचारधारा दृढ करण्यासाठी, संघटन बळकट करण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विकासासाठी पूर्ण प्रामाणिकपणे कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त करतो. बीड तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भारतीय जनता पक्षाचा झेंडा अधिक उंच फडकावा, यासाठी मी अखंड प्रयत्नशील राहणार आहे. बदलासाठीचा हा प्रवास अधिक मजबूत करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांचे, पदाधिकाऱ्यांचे आणि नागरिकांचे सहकार्य माझ्यासाठी महत्त्वाचे आहे.**

तोंडावर योगेश क्षीरसागर यांनी राजीनामा दिल्याने राष्ट्रवादीच्या विजयाचे गणित बिघडणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

● भाजपमध्ये प्रवेश केल्यावर योगेश क्षीरसागर काय म्हणाले?

योगेश क्षीरसागर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर, आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नेत्या पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपमध्ये प्रवेश केला आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने तयारीत होतो. भाजपाच्या कमळ या चिन्हावर आम्ही निवडणूक लढवणार आहोत.

● नगराध्यक्ष पदावर योगेश क्षीरसागर म्हणाले...

बीडमध्ये नगराध्यक्ष पदाला अनुसूचित जातीचे आरक्षण आहे. त्यामुळे त्या प्रवर्गातील उमेदवार आम्ही कमळ या चिन्हावर देणार आहोत. भाजपाच्या सर्व पदाधिकारी आणि नेते यांना सोबत घेऊन ▶▶ उर्वरित पान २ वर

# नगरपालिका कार्यालयात इच्छुकांची मोठी गर्दी

## उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस असल्याने गर्दी

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. नगरसेवक आणि नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या दि. १७ नोव्हेंबर हा शेवटचा दिवस असल्याने आजपासूनच नगरपालिका कार्यालयात इच्छुकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. रविवारची सुट्टी



असतानाही, निवडणूक आयोगाने ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही माध्यमांतून अर्ज दाखल करण्यास परवानगी दिली होती. त्यामुळे सकाळपासूनच बहुतांश टेबलांवर उमेदवारांची रांग लागली. अनेकांनी तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी आजच अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. उमेदवार कागदपत्राची झुळझुळ करण्यासाठी धावपळ करताना दिसून येत होते. दरम्यान, उद्या दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज दाखल ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'पत्नी गेली, सन्मानही गमावला', १०० रुपये लाचेच्या आरोपानं जीवन नरक बनलं, आता ३९ वर्षांनी निर्दोष मुक्त

**वृत्तसंस्था**

रायपूरच्या अवधिया पारामधील एका वळणदार आणि अरुंद रस्त्यांवर एक जुनं, जीर्ण झालेले घर आहे. सुमारे ८४ वर्षांचे जागेश्वर प्रसाद अवधिया या घरात राहतात. या घराच्या जीर्ण भिंतींवर ना घरमालकाच्या नावाची पाटी आहे, ना कसल्या विजयाची गोष्ट सांगणाऱ्या खुणा. मात्र, या जीर्ण घराच्या भिंतींना बोलता आलं असतं तर त्यांनी जागेश्वर प्रसाद यांची गोष्ट नक्कीच सांगितली असती. त्यांनी कशाप्रकारे ३९ वर्षं न्यायाची दारं ठोठावली याचं वर्णन केलं असतं. मात्र, जेव्हा न्यायाचं दार त्यांच्यासाठी उघडलं तेव्हा वेळ निघून गेली होती. आयुष्याच्या



अनेक खिडक्याही बंद झाल्या होत्या.

अविभाजित मध्य प्रदेशच्या राज्य रस्ते वाहतूक महामंडळात जागेश्वर प्रसाद अवधिया लिपिक म्हणून काम करत होते. त्यांना १९८६ मध्ये १०० रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. आता, जवळपास ३९ वर्षांनंतर, न्यायालयाने त्यांची सन्मानपूर्वक निर्दोष मुक्तता केली आहे.

व्यवस्थेची उदासीनता, न्याय मिळण्याला होणारा विलंब आणि माणसाच्या भंग पावलेल्या आशांचं प्रतीक ठरलेले जागेश्वर प्रसाद अवधिया सांगतात की, या निकालाला आता काही अर्थ उरलेला नाही. माझी नोकरी गेली. समाजानं माझ्याकडं पाठ फिरवली. मी मुलांना शिक्षण देऊ शकलो नाही. मी त्यांचं लग्न करू शकलो नाही. नातेवाईकांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

# उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी कक्षात फक्त ४ जनानंच मिळणार प्रवेश

**बीड । प्रतिनिधी**

नगर परिषदेचे निवडणुकीचा उमेदवारी अर्ज दाखल करताना प्रशासनाने कडक नियमावली लागू केली आहे उमेदवारांना अर्ज ऑनलाईन भरून त्यांची प्रिंट सादर करावी लागणार आहे. तसेच नाम निर्देशन पत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात उमेदवारा सहित सूचक अनुमोदक अथवा दोन व्यक्ती अशा तीन व्यक्तीनाच प्रवेश असेल अर्ज दाखल करताना होणारी गर्दी टाळण्यासाठी हा नियम लागू करण्यात आला आहे.उमेदवारांना अर्जासोबत मतदार यादीची प्रमाणित प्रत जोडणे अनिवार्य आहे जास्तीत जास्त चार नामनिर्देशन पत्र दाखल करता येतील राखीव जागेवरून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र आणि ▶▶ उर्वरित पान २ वर

# निवडणूक लढविण्यासाठी पैसा ते ३ डिसेंबरला आमचा गुलाल व फटाके ; राज्यात 'ही' ५ राजकीय विधाने चर्चेत

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात आज कोणत्या नेत्यांनी नेमकं काय म्हटलं? त्यापैकी आज दिवसभरातील पाच महत्वाची राजकीय विधाने काय आहेत? जाणून घेऊयात. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना ▶ उर्वरित पान २




# परळी नगर परिषद निवडणुकीसाठी एकूण १०१ नामनिर्देशन पत्र दाखल

**परळी । प्रतिनिधी**

परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५, दिनांक १० ते १५ नोव्हेंबर पयरत एकूण १०१ नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले आहेत. यापैकी ६ नगराध्यक्ष पदाकरिता ९५ नगरपरिषद सदस्याकरिता अर्ज दाखल झाले आहेत. परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यानंतर त्यासाठी नगर परिषदच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. नगर पालिकेसाठी १७ प्रभागात ३५ नगरसेवक निवडले जाणार आहेत. नगर परिषद क्षेत्रातील ७९,५६९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

सोमवार, १० नोव्हेंबरपासून अर्ज भरण्याची मुदत सुरू झाली आहे. तर १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २.०० वाजेपयरत ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत आहे. तसेच त्याच दिवशी १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपयरत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे हे अर्ज स्विकारले जाणार आहेत. रविवारच्या दिवशी अर्ज स्विकारण्यात येणार आहेत. त्यामुळे उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी आता अवघे १ दिवस ▶▶ उर्वरित पान २ वर

# CNG गॅस पाईपलाईनमध्ये बिघाड; मुंबईसह नवी मुंबई, ठाण्यातील सीएनजी रिक्षा-टॅक्सी, बस प्रवासावर परिणाम

**मुंबई । प्रतिनिधी**

सीएनजी पाईपलाईनमध्ये बिघाड झाल्याने मुंबई, नवी मुंबई आणि ठाण्यात सीएनजी पुरवठ्यावर परिणाम होणार आहे. गेलच्या मुख्य गॅस पाईपलाईनमध्ये बिघाड झाल्याने त्याचा परिणाम सीएनजी पुरवठ्यावर झाला आहे. त्यामुळे सीएनजीवर धावणाऱ्या रिक्षा, ▶▶ उर्वरित पान २ वर




# कर्जतमध्ये शेजारणीने २ वर्षांच्या चिमुरड्याचा गळा घोटला...

**कर्जत । प्रतिनिधी**

नेरळमध्ये एक मानवतेला काळिमा फासणारी एक घटना घडली आहे. शेजारणीने अवघ्या अडीच वर्षांच्या चिमुरड्याची हत्या करण्यात आली आहे. आरोपी जयवंता गुरुनाथ मुकणे असं या आरोपी महिलेचे नाव असून तिने नेरळ पोलिसांसमोर हत्येची कबुलीदेखील दिली आहे. तर, जयदीप गणेश वाघ या अडीच वर्षांच्या चिमुरड्याचा गळा आवळून खून करण्यात आला आहे. आरोपी महिलेने पोलिसांना दिलेली कबुलीदेखील धक्कादायक आहे.

चिमुरड्याचे आई वडील गणेश वाघ आणि पुष्पा वाघ हे मजुरीकरुन घर चालवतात. दोघंही मजुरीसाठी गेले असताना मुलं घरात खेळत होते. त्याचवेळी शेजारी राहणाऱ्या महिलेने रागातून जयदीपला उचलून नेले आणि त्याचा गळा आवळून त्याला ठार मारण्यात आले. सुरुवातीला मुलगा बेशुद्ध असल्याचे भासवत नैसर्गिक मृत्यू झाल्याचा बनाव आरोपीने केला. मात्र मुलगा काहीच हालचाल करत नाही हे पाहून पालकांना संशय आला. त्यांनी मुलाला कळंब येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र तिथे डॉक्टरांनी त्याला मृत असल्याची घोषित केले. तेव्हा पालकांनी त्यांच्या परंपरेनुसार त्याचे अंत्यसंस्कार केले. ▶▶ उर्वरित पान २ वर

# क्षीरसागरांची कोंडी, पंडितांच्या पथ्यावर !

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने 'शिवछत्र ' परिवार अर्थात पंडित बंधूंना बीडच्या राजकारणात थेट हस्तक्षेप करण्याची सक्रिय होण्याची संधी मिळाली आहे. या माध्यमातून बीड मतदारसंघात आता पंडितांचा स्वतःचा असा गट त्यांना निर्माण करता येईल असे चित्र आहे. क्षीरसागर कुटुंबाची झालेली राजकीय कोंडी पंडितांच्या राजकीय पथ्यावर पडत असल्याचे चित्र आता बीड मतदारसंघात पाहायला मिळेल.

बीड जिल्ह्याच्या राजकारणात क्षीरसागर आणि पंडित या दोन राजकीय घराण्यांचे संबंध तसे कायमच राजकीय विरोधाचेच राहिले. बहुतांश वेळा एकाच पक्षात राहून किंवा वेगवेगळ्या पक्षात असतानाही या दोन राजकीय कुटुंबांमध्ये फारशी राजकीय मैत्री टिकली नाही. काही प्रसंगातील पक्षाची भूमिका म्हणून काही प्रासंगिक करार या दोन कुटुंबांमध्ये झाले, नाही असे नाही, पण ते तेव्हढ्यापुरतेच. जसे बीडच्या राजकारणात दीर्घकाळ क्षीरसागर–मुंडे मैत्रीचे दाखले दिले जायचें, तसे बीड जिल्हा क्षीरसागर पंडितांकडे पाहतो ते राजकीय प्रतिस्पर्धी म्हणूनच. शिवाजीराव पंडितांपासून वेगळे ▶▶ उर्वरित पान २ वर

# खा. बजरंग सोनवणे यांनी पक्षाच्या वतीने नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या दिपक देशमुख यांचे नाव जाहीर

## प्रभाग क्रमांक सहा खुल्या प्रवर्गामधून दीपक रंगनाथ देशमुख, प्रभाग क्रमांक सात खुल्या प्रवर्गामधून वैजनाथ नागनाथ धंपलवार प्रभाग क्रमांक तीन हसिना जव्बार सय्यद आदी नगरसेवक पदाचे उमेदवारही जाहिर



**परळी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाची परळी काल पत्रकार परिषद खा. बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी, पक्षाचे निरिक्षक नरेंद्र काळे, प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड , नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या दीपक देशमुख,माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख, जीवनराव देशमुख, उत्तम माने,तालुका अध्यक्ष बाबा शिंदे, अँड.माधव जाधव शहराध्यक्ष सय्यद फिरोज आदींची उपस्थिती होती. दरम्यान यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे यापूर्वीचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोणाच्या ताब्यात आहे कसा आहे कुणाला सांगण्याची गरज नाही. दरम्यान लोकसभेला सर्वांनी काम केल्याचे कार्यकर्त्यांचे कौतुक खासदार बजरंग सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी प्रभाग क्रमांक सहा खुल्या प्रवर्गामधून दीपक रंगनाथ देशमुख, प्रभाग क्रमांक सात खुल्या प्रवर्गामधून वैजनाथ नागनाथ धंपलवार प्रभाग क्रमांक तीन मधून हासिना जब्बार सय्यद नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्याताई देशमुख यांची नावे यावेळी जाहीर करण्यात आली. परळीतून लोकसभेला ▶▶ उर्वरित पान २ वर



# आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन : जागतिक शिक्षणात समानता, गुणवत्ता आणि विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोनाची गरज

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन (International Students' Day) हा दिवस संपूर्ण जगभरातील विद्यार्थ्यांच्या योगदानाचा, क्षमतेचा आणि हक्कांचा गौरव करण्यासाठी दरवर्षी साजरा केला जातो. विद्यार्थ्यांच्या विकासांशिवाय कोणतेही राष्ट्र प्रगत होऊ शकत नाही, आणि म्हणूनच शिक्षणातील गुणवत्ता, समानता, सुरक्षा आणि प्रेरणा ही चार मूलभूत तत्त्वे या दिवसाच्या निमित्ताने अधोरेखित केली जातात. आजचा विद्यार्थी हे उद्याचे नेतृत्व, समाज परिवर्तनाचे साधन आणि ज्ञानआधारित अर्थव्यवस्थेचे प्रमुख घटक आहेत. म्हणून आधुनिक शिक्षण प्रणालीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे.

जगभरातील शिक्षण क्षेत्र वेगाने बदलत आहे. डिजिटल शिक्षण, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी स्थलांतर, बहुसांस्कृतिक वातावरण, कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधन अर्थव्यवस्था आणि कौशल्याधारित रोजगार ही नवीन युगातील आवश्यकता बनली आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थी केवळ पाठांतरावर आधारित शिक्षणाला मर्यादित राहू शकत नाहीत. त्यांना समज, कौशल्य, तर्कशक्ती, भावनिक बुद्धिमत्ता, जागतिक दृष्टिकोन आणि नैतिक मूल्यांचे संतुलन साधणारी शिक्षण प्रणाली हवी आहे. म्हणूनच जगातील काही देशांनी विद्यार्थ्यांना सर्वोच्च स्थान देणारी, सुरक्षित आणि समताधिष्ठित शिक्षण व्यवस्था उभारली आहे, ज्याकडून इतर देश शिकण्याचा प्रयत्न करतात.

जगातील शिक्षणविषयक आंतरराष्ट्रीय अहवालांनुसार — फिनलंड, डेन्मार्क, सिंगापूर, दक्षिण कोरिया (South Korea) आणि कॅनडा (Canada) हे पाच देश विद्यार्थी-केंद्रित,



गुणवत्तापूर्ण आणि सुरक्षित शिक्षण देणाऱ्या राष्ट्रांमध्ये अग्रस्थानी आहेत. या देशांनी वेगवेगळी मॉडेल्स स्वीकारली असली, तरी त्यांच्या धोरणांमध्ये एक समान धागा स्पष्ट दिसतो — विद्यार्थी हा संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू.

फिनलंड हा जगातील सर्वोत्कृष्ट शिक्षण मॉडेल म्हणून प्रसिद्ध आहे. येथे विद्यार्थ्यांवर परीक्षा, ताण किंवा स्पर्धेचा दबाव टाकला जात नाही. शिक्षणात समानता ही सर्वात मोठी ताकद आहे. शहरी व ग्रामीण भागातील शाळा समान दर्जाच्या आहेत आणि शिक्षकांना अत्यंत उच्च व्यावसायिक स्थान दिले जाते. शिक्षक प्रशिक्षण हे कठोर आणि संशोधनाधिष्ठित असल्यामुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास वाढवणारे, मानवी मूल्यांवर आधारित शिक्षण मिळते. डेन्मार्कमध्ये विद्यार्थी कल्याणाला अत्यंत महत्त्व दिले जाते. येथे शिक्षण पूर्णतः मोफत असून विद्यार्थ्यांना जीवनमान सुधारण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. स्वातंत्र्यपूर्ण, मुक्त आणि नवोपक्रमक्षम शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढवते. त्यामुळे डेन्मार्क हा विद्यार्थ्यांना सुरक्षित, समताधिष्ठित आणि आनंददायी शिक्षण देणाऱ्या देशांपैकी एक मानला जातो.

सिंगापूरने जागतिक स्तरावर कठोर पण परिणामकारक शिक्षण व्यवस्था निर्माण केली आहे. येथील शैक्षणिक पद्धतीने विज्ञान, गणित आणि तंत्रज्ञान (STEM) क्षेत्रात जागतिक नेतृत्व मिळवले आहे. शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक पारदर्शकता आणि कौशल्य विकास यामुळे विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक बनतात. सिंगापूरमधील शिस्तप्रिय आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षण मॉडेल इतर देशांसाठी मार्गदर्शक ठरले आहे.

दक्षिण कोरिया (South Korea) हा शिक्षणाला राष्ट्रीय प्राधान्य देणाऱ्या देशांमध्ये अग्रगण्य आहे. कठोर मेहनत, तंत्रज्ञान-केंद्रित अभ्यासक्रम, उच्च शैक्षणिक दर्जा आणि डिजिटल सुविधांमुळे येथील विद्यार्थी जगात आपले वेगळे स्थान निर्माण करतात. जरी स्पर्धा कठीण असली तरी शिक्षणाची गुणवत्ता आणि नवोपक्रमांची क्षमता या देशाला विशेष बनवते.

कॅनडा (Canada) हा आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी सर्वाधिक लोकप्रिय देश आहे. सुरक्षितता, बहुसांस्कृतिकता, संशोधन सुविधा, समावेशक धोरणे आणि स्वतंत्र कॅम्पस संस्कृती यामुळे हा देश विद्यार्थ्यांना एक आदर्श वातावरण प्रदान करतो. कॅनडामधील विद्यापीठे जगातील सर्वोत्तम संशोधन संस्था म्हणून ओळखली जातात. या देशांच्या यशामागे काही मूलभूत तत्त्वे सतत दिसतात – समानता, गुणवत्ता, मानसिक आरोग्य समर्थन, शिक्षकांचे पुनःप्रशिक्षण, डिजिटल पायाभूत सुविधा, संशोधनाधारित अभ्यासक्रम, आणि विद्यार्थ्यांवरील विश्वास. ही तत्त्वे पाळणारा कोणताही देश शिक्षणात टिकाव धरू शकतो आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवू शकतो. शिक्षणातील असमानता, आर्थिक अडथळे, तणाव, असुरक्षितता आणि कमी गुणवत्तेच्या शिक्षणाने समाजाची प्रगती थांबते; पण विद्यार्थी-केंद्रित धोरणे राष्ट्राला उज्ज्वल भविष्य घडवण्याची क्षमता देतात.

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन आपल्याला विद्यार्थ्यांच्या हक्कांची, त्यांच्या गरजांची आणि त्यांच्या स्वप्नांच्या महत्त्वाची आठवण करून देतो. विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि तणावरहित वातावरण मिळाले, शिक्षकांना प्रोत्साहन मिळाले, पालक-शाळा या दोघांनीही सकारात्मक सहकार्य केले आणि सरकारने शैक्षणिक पायाभूत सुविधांमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक केली, तर समाज अधिक न्याय्य आणि सक्षम होईल. गुणवत्तापूर्ण शिक्षण हा सर्वांचा हक्क आहे— तो सुविधा नाही, तर मूलभूत अधिकार आहे. विद्यार्थ्यांची क्षमता, त्यांची जिज्ञासा, त्यांचे विचार आणि त्यांचे प्रयत्न हेच राष्ट्राच्या प्रगतीचे वास्तविक इंजिन आहे. म्हणूनच आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा दिवस केवळ उत्सव नसून एक गंभीर चिंतन आहे— शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांसाठी किती न्याय्य आहे, किती प्रेरणादायी आहे आणि किती सुरक्षित आहे, याकडे जगाने नव्याने पाहण्याचा दिवस.

जागतिक विद्यार्थी दिन आपल्याला सांगतो की कोणताही देश प्रगत होतो तो केवळ संसाधनांनी नाही, तर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यामुळे. या भवितव्याचे रक्षण, पोषण आणि सक्षमीकरण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

**– प्रा. डॉ. भारत कऱ्हाड, अहमदपूर, जिल्हा लातूर.**

◆ पान ४ वरून पुढे...

## आ. विजयसिंह पंडित...

यापुढील काळात गेवराई शहराचा कायापालट करण्यासाठी आमच्या पदरात मतांचे आशिर्वाद द्या असे सांगून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने असे आवाहन त्यांनी यावेळी केले. प्रचार फेरीला प्रभाग क्र.१ मधील मतदारांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रभाग १ मधील उमेदवार विठ्ठल पवार, भास्कर काकडे, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष दादासाहेब चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षा मुक्ताताई आर्दड, शहराध्यक्षा पल्लवी गोगुले, उपाध्यक्षा किरण दाभाडे, योगिता तांबारे, सचिव शिला पैठणे, अनिता काळे, निता बेद्रे, संगीता घोडके, प्रिती दाभाडे, सिमा हुंडे यांच्यासह समाधान मस्के, रवि पवार, बाबुराव बेद्रे, राम बेद्रे, शंतनू परदेशी, रवि सुतार, महेश पंडित, संतोष खंडागळे, दादा बेद्रे, किशोर खंडागळे, अभिजीत तौर, स्वप्नील वाडकर, आकाश गोरे, जिजा पंडित, अमोल दावडकर, किशोर बेद्रे, अजय माने, किरण ढवारे, सखाराम गोरे, नितीन ढवारे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीडच्या तरूणाने...

तसेच सदर इसमाने त्याच्या सुरक्षेसाठी खाजगी इसम नामे विकास प्रकाश पांडागळे, रा.भिमनगर मनीषपार्क शेजारी कोंडवा खुर्द पुणे हा बॉडीगार्ड म्हणून सोबत ठेवला होता. तो देखील सदर इसमास सहाय करत असल्याचे निष्पण झाले. म्हणून इसम नामे १) अशोक भारत ठोंबरे वय ४५ वर्ष, रा.केंड फ्लोर २/३५, सदर बाझार डेली कॅन्टोलमेंट साऊथ वेस्ट दिल्ली. ११००१०, मुळ पत्ता–उंदरी ता. केज जि.बीड २) विकास प्रकाश पांडागळे, रा. भिमनगर मनीषपार्क शेजारी कोंडवा खुर्द पुणे, यांचे विरुध्द पोलीस ठाणे MIDC वाळुज येथे गुन्हा दाखल करून अटके बाबत पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. सदर इसमाने अशा प्रकारे तोतयागिरी करून कोणत्याही नागरीकांची फसवणूक केली असल्यास त्यांनी पोलीस ठाणे एमआयडीसी वाळुज, येथे माहिती दयावी असे आवाहन करण्यात येते.

## घरफोडी करणारा...

अधीक्षक सचिन पांडुरकर, पोलीस निरीक्षक शिवाजी बेंडवाड, उपनिरीक्षक श्रीराम खटाटकर तसेच पोलीस कर्मचारी राहुल शिंदे, अश्फाक सय्यद,सोमनाथ गायकवाड, मनोज पराजने यांच्या पथकाने महत्वपूर्ण भूमिका बजावली.स्थानिक गुन्हे शाखेच्या या यशस्वी कारवाईमुळे दोन घरफोडी प्रकरणांची उकल होऊन नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला आहे.

## आ. सुरेश धस...

१०.०० वा.,नांदूर येथे सकाळी ११.०० वा.आणि पारोडी फाटा येथे १२.०० वा. या चार ही रस्ता कामांचा शुभारंभ आमदार सुरेश धस यांचे हस्ते करण्यात येणार असून ग्रामीण भागातील संपर्क वाढवणाऱ्या या रस्त्यामुळे शालेय विद्यार्थी, शेतकरी, तसेच दैनंदिन कामकाज करणाऱ्या नागरिकांना मोठी सोय असल्याने समाधान व्यक्त केले असून या शुभारंभ कार्यक्रमाप्रसंगी परिसरातील पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## जल्लोष लोककलेचा...

नृत्य, वादन, गायन स्पर्धेच्या जिल्हा फेरीत हजारो बालकलावंतानी सहभाग नोंदवला. ज्यात, गेल्या चार वर्षांपासून, गेवराई शहरातील संस्कृतिक क्षेत्रात आपले अमूल्य योगदान देणारी व शेकडो पुरस्कारांवर आपली मोहोर उमटविणाऱ्या आर्ट ऑफ फन अकॅडमी च्या समूहाने महाराष्ट्राचे पारंपरिक लोकनृत्य मंगळागौर, सादर करून, परीक्षकांसह उपस्थितांचे मन जिंकत जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट संघांचा बहुमान मिळवला. ज्यामध्ये विदिशा जाधव, ज्ञानदा जोशी, मन्मथ वादवाणी, मानसी जाजू, काव्या मुंदडा, पल्लवी उघडे, प्रांजल टाक, आर्या वावरे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. व वैयक्तिक नृत्य प्रकारात मन्मथ वादवाणी, पल्लवी उघडे, स्वरा झेंडेकर, श्लोक मानधने, यांनी सहभाग घेतला या सर्व संघाला श्री.शिवकुमार सोनवणे सर,रोहित पुराणिक सर, विवेक शर्मा सर यांनी मार्गदर्शन केले. तसेच, आश्रम शाळा गेवराई मधील, पद्माकर राजू सरोदे या विद्यार्थ्याने वैयक्तिक वादन प्रकारात प्रथम क्रमांक, केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कूल चा विद्यार्थी पार्थ पवार याने वैयक्तिक लोकगीत गायन मध्ये विभागून प्रथम, क्रमांक मिळवला ज्याला संगीत शिक्षक विजय कोरडे सर यांनी मार्गदर्शन केले. तसेच समूह नृत्य प्रकारात विभागून, उत्तेजनार्थ, पारितोषक मिळाले ज्याला नृत्य शिक्षक दिपक गिरी सर यांनी मार्गदर्शन केले. तर श्री.चिंतेश्वर विद्यालय यांच्या लोकनृत्यास विभागून उत्तेजनार्थ, पारितोषिक मिळाले. ज्याला सौ.सोनाली जवकर मॅडम यांनी मार्गदर्शन केले. आर.के. पब्लिक स्कूल चा विद्यार्थी कबीरदेव विलास सोनवणे याने वैयक्तिक वादन प्रकारात तृतीय क्रमांक ,शिवशारदा पब्लिक स्कूल चा विद्यार्थी, विराट किशोर सोनवणे वैयक्तिक गायन सहभागी प्रमाणपत्र शाल्वी संदीप जवकर वैयक्तिक लोकगीत गायन सहभागी प्रमाणपत्र जि. प. मुलांची शाळा समूह नृत्य सहभागी प्रमाणपत्र मिळवले. ज्याला अश्विनी भाले मॅडम यांनी मार्गदर्शन केले.या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आर्ट ऑफ फन अकॅडमी येथे पार पडला याप्रंगी बालरंगभूमी परिषद शाखा बीड जिल्हा समन्वयक, शाहीर विलास बापू सोनवणे, श्री.चिंतेश्वर माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री.गोरकर सर यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव केला. याप्रसंगी आर्ट ऑफ फन अकॅडमी चे रोहित पुराणिक, शिवकुमार सोनवणे, विवेक शर्मा, राम जोशी सर, उमेश मानधने, योगेश मुंदडा, परिक्षीत शर्मा, सौ.मनिषा मानधने, सौ. वादवाणी, झेंडेकर, सौ.जाधव, व इतर विद्यार्थी पालक उपस्थित होते. या यशाबद्दल बालरंगभूमी परिषद शाखा बीड च्या अध्यक्षा. डॉ.दिपाताई क्षीरसागर मॅडम, उपप्राचार्य डॉ संजय पाटील देवळांकर सर,डॉ.रामटेके मॅडम, प्रा.शिंदे मॅडम, जिल्हा समन्वयक शाहीर श्री.विलास बापू सोनवणे सर, मिलिंद शिवणीकर सर,प्रा.सुरेश थोरात सर, अमित गाडे, पवन शिंदे यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सांगवी (पा.) ....

ग्रामस्थांकडून नैवेद्य, नारळ, शेरणी वाटप करण्यात आले. सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्रीयांचे हरिकीर्तन झाले.यावेळी ह.भ.प सुदर्शन महाराज, युवा नेते जयदत्त (भैय्या) धस, विजय गोल्हार,संजय गाढवे, रावसाहेब लोखंडे, उद्योजक पांडुरंग सोनवणे , शत्रुघ्न मरकड, पी.आय बाबासाहेब चव्हाण ,सरपंच दत्तात्रय खोटे , माऊली भोसले, राजू भोसले,समाजसेवक समीर शेख व गावातील ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी १२.३० ते १ वाजता श्रींची सवाद्य मंदिर प्रदक्षिणा व शोभेची आतिषबाजी यांचे आयोजन करण्यात आले. सोहळ्याची सांगता दुपारी १:३० वाजता महाप्रसादाने झाली. महाप्रसादासाठी श्री. दादाराव सोनाजी खोटे, श्री. बिभीषण साहेबराव गवारे, श्री. मारुती त्रिंबक भोसले यांचे विशिष्ट योगदान राहिले. भजनी मंडळ, गायक, मृदंगाचार्य, कावडी फराळ पंगत, शोभेची दारू, मंडप–लाईट डेकोरेशन, पिण्याचे पाणी, फुलांची सजावट, छायांकन आदी विविध सेवेसाठी अनेक मान्यवरांनी सहकार्य केले. तसेच उदार देणगीदारांनी दिलेल्या अर्पणामुळे सोहळ्याला अधिक भर पडली. समस्त श्री भैरवनाथ भक्त, सांगवी (पा.) आणि पंचक्रोशीतील नागरिकांच्या पुढाकारातून हा सोहळा यंदाही भक्तिमय वातावरणात, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण पार पडत आहे. भक्तांच्या वाढत्या सहभागामुळे सांगवीतील भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा हा परिसरातील एक महत्त्वाचा धार्मिक उत्सव म्हणून ओळखला जात आहे.

## गंगामसला सर्कल...

परिषद साठी उमेद्वारी द्यावी, ही गंगामसला सर्कल मधील सर्वांची ईच्छा आहे. माऊली सरोदे गेली १० वर्षे झाली, ते ग्रामपंचायत सरपंच सदस्य आहेत गंगामसला सर्कल मधील सर्व समाजाला परीचीत असणारे व्यक्ती आहेत,गागामसल सर्कल मध्ये सर्व समाजातील व्यक्तींना, धरुन चालणारे, गंगामसला सर्कल मध्ये तळागाळातील लोकांपर्यंत संपर्क आहे.मुडे परीवाराशी एकनिष्ठता आहे, म्हणुन जिल्हा परिषद उमेद्वारी,माऊली सरोदे यांनाच द्यावी ही तळागाळातील लोकांची इच्छा आहे.

## भावी नगराध्यक्ष....

प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नगरपालिका कार्यालयात पिण्याच्या पाण्याची आणि शौचालये दुरुस्तीची तातडीने उपाययोजना करण्यात यावी असे निवेदन मुख्याधिकारी नगरपरीषद बीड शैलेश फडसे यांना देण्यात आले.यावेळी डॉ . गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि शेख युनुस च–हाटकर यांच्या मार्फत निवडणूक अर्ज दाखल करण्यासाठी आलेल्या भावी नगराध्यक्ष आणि नगरसेवक आणि त्यांचे समर्थक यांना मोफत बाटली बंद पाण्याचे वाटप करण्यात आले

निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव आणि मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी निवडणूक कामासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठीही मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्यात अपयश आल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. याकडे प्रशासन आणि भावी लोकप्रतिनिध्यांचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि शेख युनुस च–हाटकर यांच्या पुढाकाराने आज (दि.१७) मोफत बाटलीबंद पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले. पालिकेच्या इमारतीत सर्वत्र घाण, थुंकीचे डाग, भिंतींची दुरवस्था अशी परिस्थिती असून स्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचे चित्र दिसून येत आहे.

◆ पान 9 वरून पुढे...

## अजितदादांना....

त्यांची आणि आमची संघटनात्मक शक्ती एकत्र येऊन आम्ही निवडणूक लढवू, असे योगेश क्षीरसागर म्हणाले. तिकडे त्रास होता, आता मोकळा श्वास घेतल्याची भावना– भाजपमधल्या जबाबदारीविषयी विचारले असता ते म्हणाले, बीडमध्ये प्रत्येक निवडणुकीचीच जबाबदारी आमच्यावर आहे. सध्या बीड विधानसभा क्षेत्राची जबाबदारी राहील. तिकडे काहीतरी त्रास होता. मात्र इकडे आलोय तर मोकळा श्वास घेतल्याची भावना आहे.

## नगरपालिका कार्यालयात...

करता येणार असून शेवटच्या दिवशी प्रचंड गर्दी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नवीन राजकीय समीकरणे तयार होण्याची चिन्हे दिसत असून अनेक इच्छुक वेट अँड वॉचच्या भूमिकेत आहेत. कारण सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांची घोषणा अद्याप केलेली नाही. त्यामुळे उद्याच मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होण्याची शक्यता असून नगराध्यक्ष आणि नगरसेवक या दोन्ही पदांसाठी इच्छुकांची एकच धावपळ सुरू होणार आहे. शेवटच्या क्षणापर्यंत कोणता पक्ष कोणत्या उमेदवारावर विश्वास ठेवणार? कोणाच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राजकीय वातावरण मात्र दिवसेंदिवस तापत असून आगामी नगरपरिषद निवडणूक त्रिशंकू व अधिक रंगतदार होण्याचे संकेत मिळत आहेत.

## पत्नी गेली....

स्वतःला दूर केलं. उपचाराअभावी पत्नी मरण पावली. हा गेलेला वेळ आता कुणी परत करू शकणारे का? ते अत्यंत दुखावेगानं सांगतात की, उच्च न्यायालयानं मला निर्दोष घोषित केलं आहे, पण न्यायालयाच्या या प्रमाणपत्राचं वजन मी आणि माझ्या संपूर्ण कुटुंबाने ३९ वर्षांपासून वाहिलेल्या ओझ्यासमोर फारच कमी आहे. 'लाच घेण्याला दिला होता नकार' – जागेश्वर प्रसाद अवधिया बोलत असताना मध्येच शांत होतात. जणू ते वर्षानुवर्षे दुःखावर मात करण्याचा प्रयत्न करत आहेत. ते एका जुन्या फाईलची पाने दाखवत होते. पिवळं पडलेलं प्रत्येक पान अक्षरशः जीर्ण झालेलं होतं. पण, त्यामध्ये त्यांची ३९ वर्षांची कहाणी आहे. ते अत्यंत हळूवार आवाजात सांगतात की, मी काहीही केलेलं नव्हतं. पण मला माझं सर्वस्व गमवावं लागलं. आता, मी काहीही केलेलं नव्हतं, हे सांगावं तरी कुणाला? कारण आता माझं ऐकणारं कुणीही राहिलेलं नाही. मी माझं संपूर्ण आयुष्य मी निर्दोष आहे, हे सिद्ध करण्यात घालवलं आहे. आता ते सिद्ध झालं आहे, पण आता काहीही उरलेलं नाही. अगदी वयही शिल्लक राहिलेलं नाही. न्यायालयीन कागदपत्रांवरून असं दिसून येतं की, राज्य रस्ते वाहतूक महामंडळात बिल सहाय्यक म्हणून काम करणारे जागेश्वर प्रसाद अवधिया यांना लोकायुक्त पथकानं शेजारच्या चौकात १०० रुपयांची लाच घेताना अटक केली होती.

## उमेदवारी अर्ज...

जात वैधता प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे जर जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज छाननीच्या वेळी मूळ कागदपत्रे सादर करावी लागतील उमेदवारी अर्ज ऑनलाईन भरून त्याची प्रिंट निवड निर्णय अधिकारी याकडे सादर करावी लागेल अर्ज दाखल करताना उमेदवार किंवा त्याचा एक सूचक स्वतः उपस्थित असणे आवश्यक आहे यावेळी उमेदवार सोबत केवळ दोन प्रतिनिधींना कार्यालयात प्रवेश दिला जाईल अर्ज भरताना मिरवणुकीवर प्रशासनाने निबरध घातली असून कार्यालयापासून शंभर मीटर अंतरावरच कार्यकत्यारना थांबविले जाईल.

## निवडणूक लढविण्यासाठी....

टप्प्या टप्प्याने सुरुवात झाली आहे. यामध्ये सर्वात आधी नगर पंचायत आणि नगर परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. त्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. यामुळे राज्यातील राजकीय वातावरणही सध्या तापलेले आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत जागावाटपावरून झालेल्या बेबनावामुळे अनेक ठिकाणी राजकीय पक्ष स्वतंत्रपणे लढत आहेत. याच पार्श्वभूमीवर दिवसभरातील पाच चर्चेतील राजकीय विधानांचा आढावा घेऊया.तर नक्कीच कारवाई केली जाईल– मुंबईमधील वांद्रे येथील किल्ल्यावरील मद्य पार्टीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा व्हिडीओ शिवसेना ठाकरे गटाचे नेते अखिल चित्रे यांनी एक्सवर शेअर केला आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर राज्य सरकार, राज्य उत्पादन शुल्क विभाग, तसेच मुंबई महानगरपालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत. दरम्यान, या घटनेवर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. वांद्रे किल्ल्यावर दारुपार्टीच्या व्हिडीओबाबत माध्यमांच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला. यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या घटनेचा व्हिडीओ मी पाहिलेला नाही. पण मला काही लोकांनी याबाबत सांगितले. जर अशा प्रकारे पार्टीसाठी परवानगी दिली गेली असेल तर नक्कीच कारवाई केली जाईल.

## परळी नगर...

उरले आहेत. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून छाननीची प्रक्रिया सुरू होईल. त्यानंतर वैध उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे. तसेच २१ नोव्हेंबर पयरत ज्या प्रभाग किंवा अर्जावर अपिल आहे असे सोडून इतर ठिकाणी अर्ज मागे घेण्याची मुदत असेल. २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची चिन्हांसह अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे. नगरपरिषदा निवडणुकांसाठी इच्छूक उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे ऑनलाईन; तसेच ऑफलाईन पद्धतीनेसुद्धा उद्यादेखील (रविवारी, दि.१६) स्वीकारली जातील, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार आहेत.

## CNG गॅस...

टॅक्सी, बस आणि खासगी वाहनांना या टंचाईचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. असं असलं तरी घरगुती पीएनजी ग्राहकांना मात्र कोणत्याही व्यत्ययाशिवाय गॅस पुरवठा सुरू राहणार असल्याचं महानगर गॅस लिमिटेड कंपनीकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात महानगर गॅस लिमिटेडकडून गॅसचा पुरवठा केला जातो. मात्र, आरसीएफ कंपाऊंडमधील गेलच्या मुख्य गॅस पाईपलाईनमध्ये बिघाड झाल्याची घटना समोर आली आहे. यामुळे वडाळा येथील चऋच्या सिटी गेट स्टेशनला होणारा सीएनजी गॅस पुरवठा प्रभावित झाला आहे. याचा फटका मुंबईत गॅस पुरवठ्यावर झाल्याचं पाहायला मिळतंय. मुंबईसह ठाणे आणि नवी मुंबईतील सीएनजी पुरवठ्यावर परिणाम झाल्याने सीएनजीवर धावणाऱ्या रिक्षा, टॅक्सी, बस आणि खाजगी वाहनांना या टंचाईचा सामना करावा लागणार आहे. हा पुरवठा कधीपर्यंत पूर्ववत होणार याची निश्चित माहिती नाही. त्यामुळे सोमवार या परिस्थितीचा वाहतुकीवर, प्रवाशांवर आणि सार्वजनिक वाहनसेवेवर नेमका किती परिणाम होणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे महानगर गॅस लिमिटेड कंपनीने या संबंधी एक निवेदन प्रसिद्ध केलं आहे. पाईपलाईन दुरुस्तीचे काम सुरू असून सीएनजी सेवा लवकरच पूर्ववत करण्यात येईल असा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे. तसेच याचा परिणाम घरगुती गॅस पुरवठ्यावर होणार नसल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे.

## कर्जतमध्ये शेजारणीने...

मात्र एका स्थानिक नागरिकाने पोलिसांना याबाबत गुप्तपणे माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी पुरलेला मृतदेह पुन्हा बाहेर काढून जे.जे रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. तेव्हा मुलाचा गळा आवळून खून करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. याआधी देखील आरोपी महिलेने मुलीला जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. मृत चिमुरड्याच्या मोठ्या बहिणीलादेखील मारण्याचा प्रयत्न केला होता. मात्र तो प्रयत्न फसला म्हणून तिने दुसऱ्या दिवशी मुलाला एकटं गाठून त्याचा जीव घेतला. मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळं आरोपी महिलेचा गुन्हा उघडकीस आला. शेजारची मुलं माझ्या मुलांना मारतात म्हणून मी त्याचा जीव घेतला, अशी धक्कादायक कबुली आरोपीने दिली आहे. आरोपी महिलेलादेकील तीन मुलं असून दोन जुळी मुलं दीड वर्षांची आहेत. तर, एक मोठा मुलगा बहिणीला दत्तक देण्यात आला आहे.

## क्षीरसागरांची कोंडी....

निघाल्यावर बदामराव पंडितांना क्षीरसागर कुटुंबाने दिलेले बळ असेल किंवा एका लोकसभा निवडणुकीत शिवाजीराव पंडितांनी 'टोपी' काढून केलेली घोषणा, अमरसिंह पंडितांना जिल्हापरिषदेचे अध्यक्ष होण्याची इच्छा असताना क्षीरसागर गटाने घेतलेली भूमिका असेल किंवा आणखी कोणताही प्रसंग, जिल्ह्याच्या राजकारणात क्षीरसागर – पंडितांमधील राजकीय कटुताच नेहमी चर्चिली गेली. बदामराव पंडितांच्या माध्यमातून क्षीरसागर कुटुंब गेवराई मतदारसंघात लक्ष घालते म्हणून बीड मतदारसंघात आपला 'उपद्रव' म्हणा किंवा 'प्रभाव' दाखविण्याची इच्छा तशी पंडित कुटुंबाबाची कायमच राहिलेली, पण कधी पक्षाने रोखले म्हणून असेल किंवा कधी अन्य कोणत्या कारणांनी, पंडितांना तसे ते तितकेसे जमले नव्हते. मात्र नंतरच्या काळात, विशेषतः मागच्या एका दशकात क्षीरसागर कुटुंबातच राजकीय फूट पडली, क्षीरसागर म्हणून असलेली शक्ती विभागली, त्यावेळी अमरसिंह पंडितांनी आ. संदीप क्षीरसागर यांना साथ देण्यात कसर सोडली नव्हती. मध्यंतरी पुन्हा भूमिका वेगळ्या झाल्या, मात्र या पाडव्याला आ. संदीप क्षीरसागर शिवछत्रावर येऊन गेले, यात राजकारण नाही असे कोण म्हणणार ? तर असे राजकीय नाते असल्यानेच आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीत डॉ. योगेश क्षीरसागर यांची होत असलेली कोंडी पंडित पाहत होतेच. किंबहुना बीड शहरातील 'आपल्या' गटासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी पक्षाच्या बैठकीत देखील खिंड लढविली होतीच. त्यातूनच डॉ. योगेश क्षीरसागर यांनाच पक्षाच्या पदाचा राजीनामा देण्याची वेळ आली आणि आता बीड नगरपालिकेची सूत्रे थेट 'शिवछत्र 'वरून हालत आहेत. यापूर्वी काही निवडणुकांमध्ये क्षीरसागरांच्या विरोधात आपली शक्ती क्षीरसागर विरोधकांना देण्याची भूमिका पंडितांनी घेतली होतीच, आता मात्र थेट बीड विधानसभेत राष्ट्रवादीची सूत्रे पंडित कुटुंबाकडे आली आहेत. भविष्यातील बीड विधानसभा मतदारसंघातील राजकीय बदलांची ही नांदी ठरली तर आश्चर्य वाटायला नको.

## खा. बजरंग....

मोठ्या मताधिक्याने मतदान झाले असून विधानसभेत अपघात वगळता दहशत वगैरे असल्यामुळे चांगले यश मिळू शकले नाही. महाविकास आघाडी म्हणून आम्ही एकत्र निवडणूक लढू, महाविकास आघाडीत कुणी वेगळे लढत असेल तर त्याची मनधरणी करून एकत्रित लढण्याचा प्रयत्न करणारा असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. परळी तालुका व बीड जिल्हा शरद पवारांना मानणारा आहे.जनतेने साथ द्यावी आणि २ डिसेंबरला मतदान करून निवडून द्यावे, असे आवाहन यावेळी पत्रकार परिषदेत संबोधन करताना खासदार बजरंग सोनवणे केले. यावेळी पत्रकारांच्या अनेक प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नैसर्गिक शेतीला चालना द्यावी : राज्यपाल आचार्य देवव्रत

**मुंबई । प्रतिनिधी**

रासायनिक खताच्या अतिवापरामुळे जमिनीची उत्पादक क्षमता बाधित होत असून त्यासोबतच कॅन्सर, मधुमेह, उच्च रक्तदाब अशा विविध आजारांचे प्रमाण अनेक पटींनी वाढत आहे. हे सर्व रोखण्यासाठी नैसर्गिक शेतीलाच प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी व प्रबुद्ध समाजाने आपल्या स्तरावर नैसर्गिक शेतीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून द्यावे, असे आवाहन महाराष्ट्र



व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.

'संकल्प फाऊंडेशन' या प्रशासकीय अधिकारी घडवणाऱ्या सेवाभावी संस्थेतर्फे प्रशासकीय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित लोकांसाठी 'नैसर्गिक कृषी : अनुपम भारतीय वारसा' या विषयावर राजभवन मुंबई येथे आयोजित चर्चासत्रामध्ये संवाद साधताना राज्यपाल बोलत होते.

मोठ्या प्रमाणात होत असलेली रासायनिक खतांची आवक थांबवली पाहिजे या खतांमुळे गहू व तांदूळ यातील पोषणमूल्य कमी झाले आहे. भावी पिढ्यांची अन्नधान्य व जलसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी नैसर्गिक शेती आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले.

नैसर्गिक व जैविक शेतीमध्ये मोठा फरक आहे असे सांगून रासायनिक तसेच जैविक शेती पेक्षा नैसर्गिक शेती मानव तसेच सूक्ष्म जीव कल्याणाची आहे, असे राज्यपालांनी सांगितले. धर्म, अर्थ व काम यांच्या माध्यमातून मोक्षप्राप्तीसाठी निरामय आरोग्य आवश्यक आहे व आरोग्यासाठी दिनचर्या, भोजन यांसह पर्यावरण महत्त्वाचे आहे, असे राज्यपालांनी सांगितले. आज जागतिक तापमानवाढीचे जगापुढे मोठे संकट आहे. त्याचा थेट परिणाम शेतीवर पडत आहे. त्यामुळे सर्वांनी नैसर्गिक शेतीला चालना द्यावी व नैसर्गिक उत्पादने खरेदी करावी, असे आवाहन राज्यपालांनी केले.

संकल्प फाऊंडेशनचे अध्यक्ष संतोष कुमार तनेजा यांनी आपल्या प्रास्ताविकात संकल्प फाऊंडेशनने आजवर हजारो प्रशासकीय अधिकारी घडवले असून ते भारतीय सांस्कृतिक विचार पुढे नेत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे मुंबई येथील संघचालक सुरेश भगेरिया, संकल्पचे महासचिव संतोष पाठक, सचिव राजू चौहान तसेच इतर निमंत्रित उपस्थित होते.

## आज बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**



श्रीक्षेत्र रामतीर्थ (ता. बीड) येथे प.पू. महायोगी दादा महाराज खडकीकर यांच्या विसाव्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक उत्सवाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षीप्रमाणे श्रद्धा, भक्ती आणि हरीनामाच्या गजरात सुरू होणार्या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात यंदा दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी झाली. सप्ताहाचे औचित्य साधत विविध आध्यात्मिक कार्यक्रम, प्रवचने, कीर्तन आणि भजन मंडळांच्या सेवा सुरू असून परिसरात दिंडी, नामा-घोष आणि धार्मिक शिस्तीने वातावरण भारावून गेले आहे. या आध्यात्मिक सप्ताहातील प्रमुख आकर्षण म्हणून दि. १७ नोव्हेंबर, रात्री ९.०० ते ११.०० या वेळेत प्रसिद्ध बालकीर्तनकार ह.भ.प.सोहम महाराज सातपुते यांचे प्रभावी हरिकीर्तन आयोजित करण्यात आले आहे. अल्पवयातही संत परंपरेचा गाढा अभ्यास, ओजस्वी आवाज, समजूतदार विचार आणि मनाला स्पर्श करणारी निरूपणे यामुळे सोहम महाराजांची किर्तनसेवा संपूर्ण जिल्ह्यात लोकप्रिय झाली आहे.

## धानोरा महाविद्यालयाचे प्रा निसार शेख महाराष्ट्र गौरव 'आदर्श शिक्षक' राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

### सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ राठोड यांच्या हस्ते झाला सन्मान

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील साबलखेड येथील सर्व सामान्य कुटुंबात जन्मलेल्या प्रा निसार शेख यांना शनिवारी दैनिक लोकशक्तीच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त 'लोकशक्ती महाराष्ट्र गौरव 'आदर्श शिक्षक' हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित आले. सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, नागपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक डॉ दत्ताराव राठोड, 'गावरान मस्ती' फेम वैभव कुऱ्हाडे (गंठणकुमार), ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, डॉ. कैलास दौंड, 'झुंजार नेता'चे उपसंपादक उत्तमराव बोडखे, संपादक विजय लेंडाळ, सहसंपादक इम्रान



शेख, पत्रकार जावेद सय्यद व इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

प्रा निसार शेख हे शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा येथे गेली २५ वर्षापासून प्राध्यापक म्हणून न्यायदानाचे पवित्र कार्य करीत आहेत. शिक्षण क्षेत्रा बरोबरच ते पत्रकार म्हणून ही उत्कृष्ठ कार्य करीत आहेत. शैक्षणीक व पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत असल्याने त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. प्रा निसार शेख यांनी गेली २५ वर्षात हजारो विद्यार्थी घडविले आहे. आज त्यांचे अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी विविध क्षेत्रात उच्च पदस्थ अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी अहील्यानगर येथील हॉटेल यशग्रँड येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा निसार शेख यांचे माजी आमदार भिमरावजी धोंडे, प्रशासन अधिकारी शिवदास विधाते, डी बी राऊत, माऊली बोडखे, संदीप नन्नवरे, सागर वाघुले, प्राचार्य भगवान वाघुले, उपप्राचार्य गहिनीनाथ एकशिंगे, पत्रकार अविनाश कदम, अक्षय विधाते, मुख्याध्यापक तथा पत्रकार जावेद शेख, सामाजिक कार्यकर्ते समीर शेख, संतोष नागरगोजे, गनिभाई तांबोळी, निसारभाई कुरेशी यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## महाराष्ट्र गारठला! उत्तर भारताकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे पारा उतरला

**मुंबई । प्रतिनिधी**


नोव्हेंबर महिन्याच्या मध्यावर थंडीची लाटेचा अंदाज हवामान खात्याकडून व्यक्त करण्यात येत आहे. उत्तर भारतात थंडीची लाट असून या लाटेचा परिणाम महाराष्ट्राच्या उत्तर मध्य आणि मराठवाड्यावर होताना दिसत आहे. दिल्ली,पंजाब, राजस्थानसह बहुतेक राज्यांत रात्रीचे तापमान ५ ते ९ अंशांपर्यंत उतरले आहे. या उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे महाराष्ट्रासह गुजरातच्या काही भागांतही पारा उतरला असून, उत्तर महाराष्ट्रात थंडीचा कडाका अधिक जाणवत आहे.

उत्तरेकडील राज्यांत या आठवड्यात थंडीची लाट अधिक तीव्र होण्याचा अंदाज




आहे. परिणामी महाराष्ट्रातही थंडीचा कडाका वाढणार आहे, अशी माहिती हवामान खात्याने दिली आहे. हवामान खात्याने रविवारपासून राज्यात गारठा आणि थंडीच्या लाटेचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यात रविवार, सोमवारी, धुळे व नंदुरबारमध्ये सोमवारी थंडीच्या लाटेचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. उत्तर मध्य महाराष्ट्रात कमी होणाऱ्या तापमानाचा परिणाम उत्तर कोकणातील जिल्ह्यांवरही होतो. १७ नोव्हेंबर दरम्यान तापमान १७ अंशांपर्यंत खाली येईल, अशी शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात थंडीचा जोर चांगलाच वाढला आहे. तापमान तब्बल ९ अंश सेल्सिअस नोंदवल्याने सकाळी लवकरच गारठा जाणवू लागला असून नागरिकांना हुडहुडी भरत आहे. थंडीच्या या वाढत्या लाटेतही मॉर्निंग वॉकला नागरिकांची विशेष पसंती दिसून येत आहे. ऊबदार कपडे, मफलर आणि जाकेट घालून अनेक जण सकाळी फेरफटका मारत असल्याचे चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे.

हवामान विभागाने येत्या दोन ते तीन दिवसांत तापमानात आणखी घट होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.




काही दिवसांपूर्वी जुन्नरमध्ये एका १३ वर्षांचा मुलगा बिबट्याच्या हल्ल्यात ठार झाला होता. त्यानंतर राज्यात बिबट्यांच्या वाढणाऱ्या हल्ल्याबाबत ठोस पावलं उचलावी अशी मागणी करण्यात येत आहे. जुन्नरपाठोपाठ नाशिक, अहिल्यानगर येथेही बिबट्यांने हल्ला करत नागिरकांचा जीव घेतल्याच्या घटना घडल्या होत्या. अहिल्यानगर येथील कोपरगाव तालुक्यात एकाच आठवड्यात बिबट्याने दोन बळी घेतले होते. त्यानंतर बिबट्याला ठार मारण्यात यावे अशी मागणी करण्यात येत होती. अखेर शनिवारी १५ नोव्हेंबर रोजी कोपरगाव तालुक्यातील नरभक्षक बिबट्याला ठार मारण्यात यश आले आहे. शनिवारी रात्री धारणगाव शिवारात वन विभागाने कारवाई करत बिबट्याला ठार केले आहे. गेल्या काही दिवसांपासून या बिबट्याने परिसरात धुमाकुळ घातला होता. एकाच आठवड्यात दोन बळी बिबट्याने घेतले होते. नरभक्षक बिबट्याच्या हल्ल्यात चार वर्षीय बालिका आणि ६० वर्षीय महिलेचा मृत्यू झाला होता. तेव्हापासून वनविभागाकडून नरभक्षक बिबट्याचा शोध सुरू होता.

## नगरपरिषदेच्या निवडणुकांसाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणन आवश्यक; जिल्हास्तरावर माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन : रणजितसिंह राजपूत

**नंदुरबार । प्रतिनिधी**

नगरपरिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक आणि प्रत्येक राजकीय पक्ष व उमेदवाराला समान संधी मिळेल अशा वातावरणात होण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने माध्यम क्षेत्रातील सर्व नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे सुनिश्चित करण्यासाठी व्यापक आणि शक्तिशाली पावले उचलली आहेत. निवडणूक प्रक्रियेत माध्यमांचा गैरवापर रोखणे, मतदारांना दिशाभूल होऊ न देणे आणि जाहिरातींमधील आचारसंहितेचे पालन बंधनकारक ठेवण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर माध्यम



प्रमाणन व संनियंत्रण समित्या तात्काळ कार्यान्वित करण्यात आल्या असल्याची माहिती स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा माहिती अधिकारी रणजितसिंह राजपूत यांनी दिली आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, नगरपालिका प्रशासनाचे सहआयुक्त जमीर लेंगरेकर, सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी व प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

निवडणूक जाहीर होताच जिल्हास्तरीय समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली असून जिल्हा पोलीस अधीक्षक, अपर जिल्हाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसिलदार हे या समितीचे सदस्य आहेत आणि जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव आहेत. नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींसाठी जिल्हास्तरीय समिती कामकाज करेल. माध्यमांवरील प्रत्येक जाहिरात, प्रत्येक व्हिडिओ आणि प्रत्येक सोशल मीडिया क्लिप तपासेल. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ही समिती निवडणूक जाहीर होताच स्थापन करण्यात आली असून राज्य निवडणूक आयोग स्तरावरील राज्यस्तरीय समिती ही समिती राज्यभरातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित तक्रारी, जाहिराती व प्रकरणांवर निर्णय घेणारी स्थायी व सर्वोच्च संस्था असेल, असेही यावेळी राजपूत यांनी सांगितले.

## स्वामी रामनंद तीर्थ यांचे मराठवाडा मुक्ती संग्रामात अमुल्य योगदान : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ यांनी तरुणाईमध्ये देशभक्ती जागृत केली. तसेच महिला व अनेक स्वातंत्र्यसैनिकांना सोबत घेऊन निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला मुक्त केले. त्यांचे हे योगदान अमुल्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

क्रांती चौक येथील स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे, तसेच ऑनलाईन पद्धतीने ऐतिहासिक कमल तलावाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, राज्यसभेचे खासदार डॉ.भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार



अनुराधा चव्हाण, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासह मराठवाडा मुक्ती संग्रामात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचे कुटुंबिय उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, स्वामी रामानंद तीर्थ यांचे संपूर्ण जीवन व्रतस्थ होते. स्वामी विवेकानंदाप्रमाणेच तरूणाईमध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी देशभक्ती जागृत केली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळण्याकरीता जवळपास १३ महिन्यांचा कालावधी लागला. या कालावधीत मराठवाडा निजामाच्या इस्टेटचा भाग होता. रजाकारांच्या संपूर्ण अन्यायाची पराकाष्टा झाली होती, त्याच्याविरुद्ध एक मोठा रणसंग्राम उभा झाला होता. स्वामी रामानंद तीर्थ यांनी या लढ्यात नेतृत्व करुन हैदराबाद, मराठवाड्यात स्वतंत्र अस्मितेची ज्योत पेटवली. त्यातून अनेक तरुण, महिला या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये सहभागी झाले. तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी या स्वतंत्र संग्राम सेनानींच्या हाकेला प्रतिसाद देत सैनिकी कारवाई केली आणि त्यातून मराठवाडा मुक्त झाला. तो दिवस म्हणजे १७ सप्टेंबर १९४८ हा होता. दरवर्षी मराठवाडा मुक्ती दिन म्हणून आपण साजरा करतो. या लढ्यात भरीव योगदान दिलेल्या स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे लोकार्पण करत आहोत, असे मुख्यमंत्री म्हणाले. स्वामी रामनंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे शिल्पकार निरंजन मडिलगेकर यांचा यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. निरंजन मडिलगेकर यांचा यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## राज्यात प्रथमच वन्यजीव मित्रांना विमा वाटण्यात यश

**मुंबई । प्रतिनिधी**

अलीकडेच बिहार निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. आता महाराष्ट्रातही सध्या नगरपरिषदेच्या निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. त्यादृष्टीने सर्वच पक्ष कंबर कसून कामाला लागले आहेत. याकडे लक्ष असेल. याशिवाय मनोरंजन ते क्रीडा सगळ्याच क्षेत्रातील बातम्यांकडे या ब्लॉगच्या माध्यमातून लक्ष असणार आहे.

शहापूर या ठिकाणी दुर्गम क्षेत्रामध्ये वन व वन्यजीव संवर्धन कार्यामध्ये सहभाग घेणारे अथवा वन व वन्यजीव यांचे बचाव कार्य करण्यामध्ये मोलाची मदत वनविभाग व स्थानिक नागरिक यांना करणारे वन्यजीव मित्र यांचा एक वर्षासाठीचा विमा उतरवण्यामध्ये यश प्राप्त झाले आहे. गेली चार ते पाच वर्ष सातत्याने वनपरिक्षेत्राधिकारी श्री दर्शन ठाकूर हे सातत्याने अशा वन व वन्यजीव मित्रांसाठी विम्यासाठी प्रयत्नशील होते मात्र या वर्षी प्रथमतः रोटरी क्लब ऑफ डोंबिवली यांच्या सहाय्याने या भागातील प्रथम टप्प्यातील २५ वन व वन्यजीव मित्रांना न्यू इंडिया एश्योरेंस (छशु खपवळर -ीीीरपलश) विमा देण्यामध्ये यशस्वी झाली आहे. या निमित्ताने आज शहापूर येथे या वन व वन्यजीव मित्रांना रोटरी क्लब ऑफ डोंबिवली यांच्या पदाधिकाऱ्यांकडून विमा प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. यावेळी वन व वन्यजीव मित्र यांनी आनंद व्यक्त करताना त्यांच्या कार्याचा मागोवा घेतला त्यामध्ये नेहमी या भागामध्ये काम करत असताना विविध अडीअडचणी यांच्यावर मात करून आणि वेळप्रसंगी धोका पत्करून वन्यजीवांचे बचाव कार्य हे वन व वन्यजीव मित्र करत असताना झालेल्या अपघात, दुखापत किंवा जीवित हानी याबद्दल कोणताही आधार नव्हता तथा अशावेळी या मित्रांना कुठल्याही प्रकारचे विमा संरक्षण नव्हते परंतु आज मात्र प्रत्यक्षात हे विमा संरक्षण मिळाल्याचा आनंद सर्व वन व वन्यजीव मित्र यांच्याकडून व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी मार्गदर्शन करताना वन परिक्षेत्राधिकारी श्री दर्शन ठाकूर यांनी देखील आनंद व्यक्त केला आणि विमा संरक्षण मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न याबद्दल माहिती दिली तसेच या महत्वपूर्ण कार्यासाठी रोटरी क्लब ने घेतलेली मेहनत याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. या विम्याची कोणाला गरज भासू नये अशा प्रकारे सर्वांनी मत व्यक्त केले परंतु गरजेच्या काळामध्ये यामुळे मोठा हातभार स्वतःसह कुटुंबाला मिळू शकतो एक जबाबदारी सांभाळण्याचं काम या माध्यमातून होणार आहे असे देखील त्यांनी सांगितले.

श्रीमती स्नेहल शिंदे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी पुढेही हा विमा चालू ठेवण्याचे आश्वासन दिले असून भविष्यामध्ये या व अशा प्रकारच्या विम्यासाठी ते त्यांच्या स्तरावरून जिल्हा, राज्य आणि देश पातळीवर कसे राबवता येईल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • सोमवार, दि. १७ नोव्हेंबर २०२५ • पान ४

# आ. विजयसिंह पंडित यांनी संजयनगरमधील लोकांना हक्काचा पीटीआर मिळवून दिला

**• नगर परिषद निवडणुकीत गेवराई शहर राष्ट्रवादीमय**

गेवराई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी अनेक वर्षांपासून रखडलेला संजयनगर येथील नागरीकांच्या पीटीआरचा प्रश्न कायम निकाली काढला, या भागातील लोकांना हक्काचा पीटीआर मिळवून दिला. जनतेच्या सेवेसाठी कायम शिवछत्र परिवार पुढे राहिलेला आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई शहराचा चेहरामोहरा बदलायचा आहे. त्यासाठी विरोधकांच्या भुलथापांना बळी न पडता घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून माझ्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना नगर परिषदेमध्ये पाठवा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या



नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे यांनी केले. गेवराई शहरातील प्रभाग क्र.१ मध्ये मतदारांशी सुसंवाद साधताना त्या बोलत होत्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई दाभाडे यांच्या प्रचारार्थ प्रभाग क्र.१ मध्ये राष्ट्रवादीच्या महिला कार्यकर्त्यांनी प्रचार फेरी काढली. संजयनगर, शिवाजीनगर या भागातील मतदारांच्या गाठीभेटी घेऊन सौ.शितलताई दाभाडे यांनी मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, नगर परिषदेची निवडणुक मतदार बंधु-भगिनींनीच आपल्या हाती घेतली आहे. सर्वत्र राष्ट्रवादीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी या भागाचा पीटीआरचा प्रश्न निकाली काढल्यामुळे मतदार बंधु-भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# आ. सुरेश धस यांच्या हस्ते ०६ कोटी ७४ लाख रुपये खर्चाच्या चार भव्य रस्ते विकास कामांचा आज शुभारंभ

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदार संघातील पायाभूत सुविधांच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणारे, कार्यक्षम आणि विकासाभिमुख आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून जिल्हा नियोजन विकास समितीकडून तब्बल ०६ कोटी ७४ लाख रुपये एवढा भरीव निधी मंजूर झाला आहे. या निधीतून तालुक्यातील



चार महत्वाच्या रस्ते विकास कामांना मंजुरी मिळाली असून, या सर्व कामांचा भव्य शुभारंभ आज होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांना या रस्त्यांच्या उन्नतीची प्रतिक्षा होती. अपुऱ्या दळणवळण सुविधांमुळे शेतकरी, कामगार, विद्यार्थी व सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी सातत्याने पाठपुरावा करून तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असा निधी मंजूर करून घेतला आहे.

मंजूर झालेली रस्ते विकास कामामध्ये- १. राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते नांदूर ७० लाख रुपये निधी, २. राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते अंभोरा-हिवरा - १ कोटी ५४ लाख रुपये निधी, ३. प्रमुख जिल्हा मार्ग १ ते पारोडी-बोरोडी - ३ कोटी ५० लाख रुपये निधी, ४. लोणी ते खुंटेफळ-वाटेफळ १ कोटी रुपये निधी,या चार ही रस्ते कामांचा भव्य शुभारंभ अंभोरा येथे सकाळी ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर, जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम तसेच माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी नगरपालिका निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषद येथे ए/बी फॉर्म सादर करण्याबाबत अधिकृत जोडपत्र दाखल केले.*

# जल्लोष लोककलेचा स्पर्धेत गेवराईच्या बाल कलावंतांनी फडकवला विजयी पताका

**तर, आर्ट ऑफ फन अकॅडमी, गेवराई चा संघ सर्वोत्कृष्ट पारितोषिकाने सन्मानित**



गेवराई । प्रतिनिधी

बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती मुंबई, आयोजित, जल्लोष लोककलेचा स्पर्धेत गेवराई मधील आर्ट ऑफ फन अकॅडमी च्या संघाने सर्वोत्कृष्ट संघाचा बहुमान मिळवला. तर इतर स्पर्धकांनी व विविध पारितोषिके प्राप्त केले.

अधिक माहिती अशी की, बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती मुंबई आयोजित जल्लोष लोककलेचा ही स्पर्धा बालकलावंताच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांना महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा माहित होण्यासाठी आयोजित केली होती. ज्यामध्ये दि.१५ रोजी सौ. के.एस. के महाविद्यालय बीड येथे सादर झालेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# सांगवी (पा.) येथे श्री भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा उत्साहात संपन्न



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे पंचक्रोशीतील भाविकांच्या उपस्थिती मध्ये श्री भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा १२ ते १३ नोव्हेंबर २०२५ या दोन दिवशी उत्साहात साजरा झाला. भक्तिमय वातावरण, धार्मिक कार्यक्रमांची चुरस, भजनी मंडळांचा सहभाग आणि महाप्रसादाच्या महिमा यामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

पहिल्या दिवशी बुधवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजता क्षेत्र काशी, पैठण, नागतळा येथून आलेल्या कावडींची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर कावड निवड कार्यक्रम पार पडला. रात्री ९ ते १० दरम्यान विनोदाचार्य ह.भ.प. भाऊसाहेब महाराज पन्हाळकर यांनी भाविकांना कीर्तनातून अध्यात्म आणि भक्तीची प्रेरणा दिली. रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत काशीनाथ जाधव व सहकारी यांनी नाथजन्म आख्यान सादर केले. मध्यरात्री १२ वाजता श्रींचा लघुरुद्राभिषेक, पुष्पवृष्टी व कावडीचे पाणी असा प्रमुख सोहळा संपन्न झाला.

गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ ते ९ या वेळेत ▶▶ उर्वरित पान २ वर

# पाली व येळंब घाट गणातील तांदळ्याचीवाडीत कॉर्नर बैठक संपन्न

**• बप्पासाहेब घुगे यांनी गावकऱ्यांशी साधला संवाद**

बीड । प्रतिनिधी

पाली जिल्हा परिषद सर्कल आणि येळंब घाट पंचायत समिती गणातील तांदळ्याचीवाडी येथे आयोजित करण्यात आलेली कॉर्नर बैठक मोठ्या उत्साहात व उपस्थितीत संपन्न झाली. या बैठकीत स्थानिक प्रश्न, विकासकामे, शैक्षणिक व आरोग्यविषयक



गरजा तसेच मूलभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली. बैठकीदरम्यान बप्पासाहेब घुगे यांनी गावकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि प्रलंबित मागण्या जाणून घेतल्या. गावकऱ्यांनी रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, शेतीसंबंधी समस्यांबाबत मोकळेपणाने मते मांडली. घुगे यांनी या सर्व प्रश्नांवर सकारात्मक प्रतिसाद देत स्थानिक विकासाला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले.

तांदळ्याच्यावाडीतील नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती पाहून विकासाची इच्छाशक्ती अधिक दृढ झाल्याचे बप्पासाहेब घुगे यांनी सांगितले. लोकांच्या विश्वासाला उतरून त्यांच्यासाठी काम करणे हीच माझी प्राथमिकता आहे, असेही ते म्हणाले. कॉर्नर बैठकीमुळे गावकऱ्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे दिसून आले असून येळंब घाट परिसरातील विकासासाठी या संवादातून सकारात्मक दिशा मिळाल्याची भावना लोकांतून व्यक्त होत आहे.

## गंगामसला सर्कल मध्ये फक्त माऊली सरोदे यांची हवा पहिल्या टोकापासून तर शेवटच्या टोका पर्यंत संपर्क असणारे माऊली सरोदे

माजलगाव । प्रतिनिधी

गंगामसला जि.प.गट हा ओबीसी साठी आरक्षित करण्यात आला असून माऊली सरोदे एक सक्षम चेहरा म्हणून सर्व परिचित सर्वसामान्यांच्या सुख,दुःखामध्ये धावून जाणारे व्यक्तिमत्व म्हणजे माऊली सरोदे मुंडे साहेब पंकजा ताई राम शिंदे गोपीचंद पडळकर महादेव तात्या निर्मळ यांच्या पासून राजकीय कार्यकर्ता म्हणून सुरूवात करुन, आजही ताई च्या परीवाराच्या प्रत्येक राजकीय निर्णयाशी, सहमत होऊन मुंडे घराण्यासोबत राहणारे, माझ्या राजकीय कार्यकर्ता म्हणून सुरुवात मुंडे घराण्यापासुन झाली, आणि शेवटही मुंडे घराण्याशी एकनिष्ठ



असलेला कार्यकर्ता म्हणुनच होणार, असे छातीठोकपणे सांगणारे,माऊली सरोदे यांना एकनिष्ठेचे फळ म्हणून यांनी, गंगामसला सर्कल येथे, गंगामसला जिल्हा ▶▶ उर्वरित पान २ वर

# भावी नगराध्यक्ष आणि नगरसेवकांसाठी मोफत बाटली बंद पाणी वाटप

**• नगरपालिकेत पिण्याच्या पाण्याची वानवा : डॉ. गणेश ढवळे**

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपालिका निवडणुकीचा बिगुल वाजताच नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी अर्ज भरण्यास इच्छुकांची पालिकेत मोठी गर्दी वाढली आहे. मात्र, अर्ज भरण्यासाठी आलेल्या इच्छुक आणि समर्थकांचीच नव्हे तर निवडणूक कर्मचार्यांचीही पालिकेत



पिण्याच्या पाण्यासाठी अक्षरशः पंचाईत होत आहे. पालिकेतील पिण्याचे पाणी फिल्टर अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत आहे. पाणी उपलब्ध नसल्याने अर्जदार आणि नागरिकांना पाणी प्यायला बाहेरच्या हॉटेलमध्ये जावे लागत आहे. पाणी खरेदीसोबत चहाचा खर्चही करावा लागत असल्याने त्यांच्यावर अनावश्यक आर्थिक भुर्दंड पडत आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पालिकेच्या मुख्य इमारतीतच पाण्यासाठी ही धावपळ होत असल्याने ▶▶ उर्वरित पान २ वर

**• शौचालयाअभावी भावी लोकप्रतिनिधींची कुचंबना**

**शहराचे भावी नेतृत्व करण्याचे स्वप्न पाहत अर्ज भरण्यास आलेल्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या इच्छुकांना आणखी एक मोठी अडचण सहन करावी लागत आहे. पालिकेच्या तळमजल्यावरील वाहन पार्किंग परिसरातच उघड्यावर लघुशंका करण्याची वेळ अनेकांवर येत आहे. पहिल्या मजल्यावरील शौचालये पत्रे लावून बंदिस्त करण्यात आली आहेत. निवडणुक कार्यासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना शौचालयासाठी दुसरा-तिसरा मजला चढावे लागत आहे.**

## क्राईम...

### बीडच्या तरूणाने पीएमओ सचिव असल्याचे भासवून केली फसवणूक

**साथीदारासह वाळूज पोलिसांनी केली अटक**



बीड । प्रतिनिधी

रविवार दि.१६ रोजी व पोलीस ठाणे एमआयडीसी वाळुज हद्दीत व्हीआयपी मुव्हमेंट साठी बंदोबस्त लावण्यात आला होता. पोलीस बंदोबस्त दरम्यान कार्यक्रम स्थळी झचज सचिव भारत सरकार कार्यालयातील अधिकारी म्हणून एका व्यक्तीचे स्वागतासाठी नाव पुकारण्यात आले. त्यावेळी बंदोबस्ताच्या ठिकाणी हजर असलेले परिमंडळ-१ पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर पोलीस उपआयुक्त, यांना प्रधान मंत्री कार्यालयाचे कोणीही अधिकारी शहरात दौर्यावर नसल्याने सदर इसमा बाबत संशय आल्याने अधिक चौकशी साठी त्या इसमास पोलीस ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी त्याच्याकडे चौकशी केली असता सर्व भांडाफोड झाला. अशोक भारत ठोंबरे असे सांगून सुरवातीस तो निती आयोग भारत सरकार याचा सदस्य असल्याचे सांगीतले. परंतू बारकाईने विचारपूस करता त्याच्याकडे तसी कुठलीही ओळख पुरावा मिळून आला नाही. तो खोटी माहिती देत असल्याचे व लोकसेवक म्हणून तोतयगिरी करत असल्याचे निदर्शनास आले. त्यावर त्याच्या झडती मध्ये त्याचे सुटकेस मध्ये एक पांढर्या रंगाच्या पाटीवर लाल रंगाच्या अक्षरा मध्ये मराठी मध्ये भारत सरकार असे लिहलेली पाटी तसेच GOVT.OF INDIA असे लिहलेली पाटी व वाहनावर लावण्यासाठी वारण्यात येणारा भारतीय राष्ट्रध्वज अशा वस्तू मिळून आल्या. ▶▶ उर्वरित पान २ वर

### तलवार घेऊन फिरणाऱ्यास अटक बीड शहर पोलिसांची कारवाई



बीड । प्रतिनिधी

दिनांक १६/११/२०२५ रोजी १४:१५ वा. चे सुमारास अजिजपुरा, नूर मस्जिद च्या बाजूला बीड शहरात तलवार घेऊन फिरत असलेल्या व्यक्तीस बीड शहर पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून चार तलवारी जप्त करण्यात आल्या आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांकडून अवैध शस्त्रधारकांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. सदरील व्यक्ती शेरसिंग हिंदू सिंग टाक, वय अंदाजे ५५ वर्ष, रा. वडवणी, ता.वडवणी जि.बीड असून त्याच्याकडून आणखीही अवैध शस्त्रे मिळण्याची शक्यता आहे. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी सर्व पोलिस ठाणे प्रमुखांना निवडणूक काळात अवैध शस्त्रे जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने बीड शहर पोलिसांनी तत्परता दाखवत ही कारवाई केली आहे. बीड शहर पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, कोणाकडेही अवैध शस्त्र, तलवार, दारुगोळा किंवा गावठी पिस्तूल असल्याची माहिती असल्यास मो. ७५८८८०७७७४ किंवा पीएसआय महेश जाधव - मो.९०२१२१६२५६ यावर कळवावे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार व पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय श्री. खेडकर, पीएसआय श्री. महेश जाधव, श्री. गणेश कुमावत तसेच पोलिस अंमलदार गहिनीनाथ बावनकर, राम पवार, सुशेन उगले, इलियास शेख यांनी केली आहे.

### घरफोडी करणारा आरोपी एलसीबीने केला जेरबंद



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये मागील काही महिन्यापासून दिवसा घरफोडी चोरी होण्याच्या प्रकारात वाढ होत असल्याने दिसत आहे.दिनांक १२ आणि १४ नोव्हेंबर रोजी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन वेगवेगळ्या दिवसा घरफोडीच्या फिर्यादी दाखल झाल्या होत्या. याबाबत स्थानिक गुन्हे शाखेकडून तपास सुरू होता. तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आज १५/११/२०२५ रोजी दोन्ही घरफोडी प्रकरणातील आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपीची ओळख : अमोल गणेश रांजवण (वय ३५, रा. माळीवाडा, बीड) व आकाश भोसले यांनी दोघांनी चोरी केल्याची माहिती पोलिसांना मिळताच अमोल रांजवण आरोपी हा मोटारसायकलवर संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटाटकर यांच्या पथकाने सदर ठिकाणी धाड टाकून आरोपीला ताब्यात घेतले. अटक केल्यानंतर पोलिसांनी चौकशी केली असता आरोपीने दोन्ही दिवसा घरफोडी केल्याची कबुली दिली. तसेच त्याचा साथीदार आकाश भोसलेंचेही नाव सांगितले.सोबतच एकूण ९६,००० रुपयांचे सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा १,४६,००० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.या कारवाईत पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत अपर पोलीस ▶▶ उर्वरित पान २ वर